अधिसूचना

क्र. ०२/२०२४ दिनांक : ०४ जानेवारी, २०२४

विषय :-उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अनुदानित, विना अनुदानित, व कायम विना अशासकीय अनुदानित संलग्नित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र. १०५/(१)/मशि-३, दिनांक २७ मार्च, २०२३

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उपरोक्त विषयान्वये शासन निर्णय क्र. टीईटी – २००८ (१८३/०८)/तशि-३, दिनांक ५ नोव्हेबर २००८ निर्गमित केले आहे;

आणि

ज्याअर्थी, शासनाने सुधारीत शासन निर्णय क्र. २०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ निर्गमित केले आहे;

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांसाठी विनियम क्र. ०२/२०२० दि.२७ ऑगस्ट, २०२० निर्गमित केले आहे;

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भांकित शासन निर्णय निर्गमित करुन सर्व शासकीय/अशासकीय अनदानित महाविद्यालयांमधील अभ्यांगत / तासिका तत्वावरील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षकांचे मानधनात दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून वाढ केली आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना माहिती व त्यानुसार कार्यवाहीस्तव अधिसूचित करण्यात येत आहे की,

१) उपरोक्त शासन निर्णय सर्व संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयाला लागू करण्यात आला आहे. तसेच अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांना सदर वाढीव दर व्यवस्थापन परिषदेने दिनांक १७/१०/२०२३ (तहकुब सभा ०९/१०/२०२३) च्या सभेत विषय क्र. १२७ अन्वये लागु केले आहे.

शासनाने वाढ केले सुधारीत दर खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचा प्रकार	सुधारीत दर (प्रति तासाकरीता)	
		सैव्दांतिक	प्रात्यक्षिके
१	कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी)	रु. ९००/-	रु. ३५०/-
२	कला, वाणिज्य विज्ञान (पदव्युत्तर)	रु. १०००/-	रु. ४५०/-
३	शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षण (पदवी/पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम)	रु. १०००/-	रु. ४५०/-
४	विधी (पदवी /पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम)	रु.१०००/-	रु. ४५०/-

२) सदरहु सुधारित दर दिनांक १ एप्रिल, २०२३ पासुन अनुज्ञेय राहील.

३) वरील सुधारित दर खालील अटींच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आले आहे.

(अ) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील शिक्षकांसाठी उपरोक्त दिनांक ५ नोव्हेबर, २००८ च्या शासन निर्णयामधील नमुद अटी कायम राहतील.

(ब) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील शिक्षकांना उपरोक्त दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद अटी कायम राहतील, आणि विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयाला सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद सर्व अटी (अट क्र. २,७ व ११ वगळुन) लागु राहतील.

याव्यतिरिक्त सध्याचा तासिका कालावधी ४८/५० मिनिटांऐवजी ६० मिनिटे करण्यास मान्यता देण्यात येत आहे, जेणेकरुन ९ तासिकांची परिगणना करणे सोईचे होईल. तसेच National Credit Framework च्या अनुषंगाने Credit साठी आवश्यक अध्यापनाचे वेळापत्रक (Lecturers Schedule) करणे सोईचे होईल, मात्र National Credit Framework ची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होईपर्यंत विद्यापीठांना सध्याचा तासिका कालावधी चालू ठेवण्याची मुभा राहील.

स्वा/-

(डॉ. तुषार देशमुख)

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ